# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

**दूरध्वनी –(०२१८९) २३३००१** **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

**(४०) हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दिनांक १६/१०/२०२०**

| मागील आठवडयातील हवामान (दि.१०.१०.२०२० ते १६.१०.२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (दि.१७.१०.२०२० ते २१.१०.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** | **१६** | **दिनांक** | **१७** | **१८** | **१९** | **२०** | **२१** |
| ०.० | २०.२ | २४.२ | १६.४ | ५९.६ | ८२.० | ६.३ | **पाऊस (मि. मी.)** | ७.० | २.० | १८.० | २५.० | २३.० |
| ३५.८ | ३५.२ | ३०.१ | ३१.४ | ३१.२ | २६.६ | २५.४ | **कमाल तापमान (अं. से.)** | २६.० | २७.० | २९.० | ३०.० | ३०.० |
| २३.२ | २२.४ | २१.३ | २०.३ | २०.० | २०.६ | २०.९ | **किमान तापमान (अं. से.)** | २२.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | **ढग स्थिति (आकाश )** | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ८३ | ८७ | ८५ | ९८ | ८५ | ८५ | ९३ | **सकाळची सापेक्ष आद्रता (%)** | ९० | ८४ | ८७ | ९१ | ९० |
| ४८ | ८५ | ८३ | ८१ | ६४ | ८५ | ६९ | **दुपारची सापेक्ष आद्रता (%)** | ६७ | ५५ | ५४ | ६६ | ६१ |
| ०.० | ०.० | ०.० | ३.१ | ३.७ | १.९ | ८.० | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १०.० | १०.० | १४.० | १४.० | २१.० |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| **पीक** | **अवस्था** | **कृषि विषयक सल्ला** |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी तर दिनांक १८, १९ आणि २० ऑक्टोबर २०२० रोजी काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कमाल तापमान २६ अंश सेल्सिअस ते ३० अंश सेल्सिअस पर्यंत तर किमान तापमान २२ ते २३ अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी १० ते २१ कि.मी. पर्यंत राहण्याची शक्यता आहे.<br>**ईशारा :** सोलापूर जिल्ह्यात दिनांक १९ आणि २० ऑक्टोबर २०२० रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ मागील चार दिवसांत झालेला जोरदार पाऊस व पुढील पाच दिवसांत पडणाऱ्या पावसाच्या अंदाजानुसार पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.<br>➢ तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची तसेच आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने पक्व खरीप पिकांची (मका, भुईमूग व सोयाबीन) त्वरित काढणी करावी व काढणी केलेल्या शेत मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून पिकांवर किटकनाशकांची, बुरशीनाशकांची फवारणी करावी.<br>➢ पडणाऱ्या पावसाचे पाणी शेतात साठविण्यासाठी मुरविण्यासाठी उपाययोजना करावी.<br>➢ शेतकरी बांधवांनी स्वतःजवळ अँड्रॉईड मोबाईल असल्यास हवामान आधारित शेतीविषयक सल्लासाठी गूगल प्ले स्टोअर वरुन **"मेघदूत" ॲप** तर मेघगर्जना व वीजांचा कडकडाट ई. च्या अंदाजांसाठी **"दामिनी " ॲप** डाऊनलोड करावे व त्याचा वापर करावा. |
| **संदेश** | | मागील चार दिवसांत झालेला जोरदार पाऊस व पुढील पाच दिवसांत पडणाऱ्या पावसाच्या अंदाजानुसार पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| **उस** | **पूर्व हंगामी उसाची लागवड** | पाऊस झाल्यानंतर आडसाली ऊस पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. पूर्वहंगामी उसाची लागवड १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या दरम्यान करतात. लागवडीकरिता को- ८६०३२ (निरा), को- ९४०१२(फुले सावित्री), को- ८०१४, को.एम. ०२६५ (फुले -२६५), फुले १०००१ या वाणांची शिफारस आहे. |
| **तूर** | **फुलोरा अवस्था** | पाऊस झाल्यानंतर तूर पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| **रब्बी ज्वारी** | | पाऊस झाल्यानंतर रब्बी ज्वारी पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| **भुईमुग** | **पक्वता व काढणी** | पाऊस झाल्यानंतर भुईमूग पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. पाऊस थांबताच पक्व भुईमूग पिकाची काढणी करावी व शेंगांची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **मका** | **पक्वता व काढणी** | पाऊस झाल्यानंतर मका पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. पाऊस थांबताच पक्व मका पिकाची काढणी करावी व धान्याची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |

# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

**दूरध्वनी** –(०२१८९) २३३००१ **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **केळी** | **वाढीची अवस्था** | पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. केळी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| **डाळिंब** | **फळ पक्वता** | पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. डाळिंब बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| **द्राक्ष** | **छाटणी पूर्व अवस्था** | पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. द्राक्ष बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | पावसाळ्यात गवत जास्त प्रमाणात खाल्ले गेल्यास जनावरांची अन्नपचनाची क्रिया बिघडते व त्यांना हगवण लागते . त्यामुळे पावसाळ्यामध्ये चराऊ जनावरांच्या आहारात वाळलेल्या चाऱ्याचे प्रमाण तुलनात्मक रित्या अधिक ठेवावे. जनावरांच्या गोठ्याभोवती पाणी साठणार नाही तसेच गोठ्यात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. जनावरांना पोटातील जंत यांच्या नियंत्रणासाठी पशुवैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशुवैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे तसेच जनावरांना व पक्षांना नेहमी पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाणी द्यावे. |

**स्त्रोत :**
**१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान :विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर.**

ठिकाण :कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.
दि. : १६ ऑक्टोबर २०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.**